# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen/ missing Property**

**Police Station** :- **Washim Police**

**Date of Good Work done** :- **03/03/2023**

**Brief of the work done :-**

मुद्देमाल परत मोहीमे अंतर्गत मा. श्री. जयंत नाईकनवरे, , विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांच्याहस्ते विविध गुन्ह्यातील 94 लाख रुपयांचा जप्त मुद्देमाल मूळ मालकांना परत करण्यात आला.



# चोरीतील मुद्देमाल मुळ मालकांना सुपूर्द

## फिर्यादीच्या चेहऱ्यावर तरळले हास्य; जिल्हा पोलीस दलाची कामगिरी

**वाशीम, दि. ५ (प्रतिनिधी)**

चोरीस गेलेली वस्तू मिळण्याची अपेक्षा मावळल्यातच जमा असते. परंतू वाशीम पोलिसांनी हा समज खोडून काढत ६८ गुन्ह्यांची उकल करुन चोरीस गेलेले सोन्या, चांदीचे दागीने, मोबाईल, दुचाकी व चारचाकी वाहने तसेच शेतमाल असा तब्बल ९४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन मुळ मालकांना परत केला. विशेष पोलीस महानिरीक्षक जयंत नाईकनवरे, पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या उपस्थितीत हा मुद्देमाल परत देण्यात आला. चोरीस गेलेली आयुष्या जमापुंजी परत मिळाल्याचे समाधान फिर्यादीच्या चेहऱ्यावर यावेळी दिसून आले.

मागील काही दिवसांमध्ये चोरीच्या घटनांमध्ये चोरट्यांनी कोट्यवधींचा मुद्देमाल लंपास केल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. या चोरट्यांचा मुसक्या आवळण्यासोबतच मुद्देमाल हस्तगत करण्याचे आव्हान पोलिसांसमोर होते. जिल्हा पोलीस दलानाने या आव्हान लिलया पेलत वर्षभरातील घटनांमधील ६८ गुन्ह्यांची उकल करुन चोरट्यांना ताब्यात घेतले. या चोरट्यांकडून सोन्या, चांदीचे दागीने, मोबाईल, दुचाकी व चारचाकी वाहने तसेच शेतमाल असा तब्बल ९४ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. आधीच मालमत्तेच्या नुकसानीने त्रस्त असलेल्या फिर्यादींना सदर मुद्देमाल वेळेवर परत मिळावा.

मालमत्तेच्या गुन्ह्यांमध्ये फिर्यादींच्या झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणजे लवकरात लवकर तपास होऊन न्याय मिळाला पाहिजे व त्याच वेगाने फिर्यादीचा सदर गुन्ह्यातील मुद्देमाल हा मूळ मालकांना परत मिळावा. यासाठी अमरावती परीक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक जयंत नाईकनवरे यांच्या आदेशाने सदर उपक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी अशा मोहिमा राबवून अधिकाधिक गुन्ह्यांची उकल करन चोरीतील मुद्देमाल मुळ मालकांना मिळवून देण्यासाठी अशा मोहिमा वारंवार राबविल्या जाणार असल्याचे सांगीतले. दरम्यान, या वर्षभरात पोलिसांनी तीन मुद्देमाल परत मोहीम राबविल्या असून त्यामध्ये एकुण २ कोटी ९३ लाख रुपयांचा मुद्देमाल मूळ मालकांना परत केला आहे. त्यामुळे आपला मुद्देमाल परत मिळाल्याचा आनंद फिर्यादींनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला व पोलीस प्रशासनाचे आभार मानले.मागील सदर मुद्देमाल परत मोहीम पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या आदेशाने व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव, एपीआय विजय जाधव, संतोष कंकाळ, मुकेश भगत, गजानन गोटे व विठ्ठल सुर्वे या पथकासह सर्व पोलीस स्टेशनचे मुद्देमाल मोहरर व त्यांचे मदतनीस यांच्या सहभागातून पार पाडला.









